‘‘अस्सं. मग आता नाही वाटतं कोणी बरोबर ? तुला शाळेत पोहोचवायला, घरी न्यायला येत नाही कोणी ?’’ काकांनी विचारले.

‘‘येतं ना ! बाबा सकाळी शाळेत पोहोचवतात अन् मग तसेच ऑफिसला जातात. आमचा गडी सखाराम दुपारी येतो न्यायला.’’ मुलगी म्हणाली.

‘‘मग आज नाही आला तो ?’’ काका.

‘‘नाही नाऽऽ ! तो सुट्टीवर आहे आज !’’

‘‘मग तू घरी कशी जाणार ?’’ काकांनी विचारले.

‘‘मला घर माहीत आहे. सखारामबरोबर रोज जाते ना, तेव्हा सगळा रस्ता पाहून ठेवलाय मी. तो बघा, समोरच्या त्या उंच इमारतीवर मोठ्ठा टीव्ही काढलाय ना, तिथून वळायचं. मग मोठ्ठं मैदान लागतं. तिथं एक बेकरी आहे. बेकरीजवळून अगदी सरळ गेलं ना काका, की येतं माझं घर.’’

ती नीट समजावून सांगत होती. त्या धिटुकलीच्या बोलण्याची त्या काकांना गंमत वाटत होती.

‘‘नाव काय बेटा तुझं ?’’ त्यांनी मध्येच विचारले.

‘‘माझं नाव आहे मृणालिनी, पण सगळे मला मिनू म्हणतात. काका, तुम्हीपण मिनूच म्हणा.’’

‘‘बरं, पण काय गं मिनू, आईनं तुला एकटंच यायला सांगितलं ?’’

‘‘नाही हो, एकटं नाही. आमच्या घराजवळ राहणारी सोनल आहे ना, तिच्याबरोबर यायला सांगितलं होतं.’’

‘‘मग सोनल कुठे आहे ?’’

‘‘ऊं ! ती गेली मघाशीच. भारी शिष्ट आहे ती ! ती मला चल म्हणत होती, पण मलाच राग आला. किती टिंगल केली तिनं माझी ? मी म्हटलं, मला नाही यायचं तुझ्याबरोबर. तू जा. मला माहीत आहे माझं घर.’’

‘‘मग काय म्हणाली ती ?’’ – काकांनी विचारले.

‘‘ती म्हणाली जा. रस्त्यात घाबरशील. मग येईल तुझी आई मला विचारायला.’’ मिनू म्हणाली.


‘‘पण तुला तर रस्त्याची भीती वाटते ना ?’’ काका.

‘‘अहो, फक्त रस्ता ओलांडताना जीव घाबरतो. वाटतं, सगळ्या गाड्या आपल्याच अंगावर येत आहेत.’’

ते हसले.

‘‘काका, तुम्ही मदत कराल ? बोट धराल माझं ? – फक्त पलीकडे जाण्यापुरतं. मग जाईन मी माझी. मला माहीत आहे पुढचा रस्ता.’’

मिनू उत्साहाने बोलत होती. तिच्या आवाजात आर्जव होते. काकांची छाती मात्र धडधडू लागली होती.



‘‘चला ना काका !.... प्लीऽऽज !’’ मिनू म्हणाली.

मिनूच्या आवाजातल्या आर्जवीपणामुळे काकांना गलबलून आले. काय सांगावे या भोळ्या, लहानग्या जिवाला हे त्यांना समजेना; पण तोपर्यंत तिने काकांचा हात पकडला होता आणि ती त्यांना चलायचा आग्रह करत होती. तिच्या स्पर्शातला भोळा विश्वासच त्या काकांना नवे बळ देत होता.

‘‘हे बघ, रस्ता क्रॉस करताना घाबरायचं मुळीच नाही. आधी झेब्रा क्रॉसिंग कुठे आहे ते बघायचं.’’ काका म्हणाले.

‘‘म्हणजे रस्त्यावरचे ते पांढरे पट्टे ना?’’

‘‘हो तेच. दाखव बरं कुठं आहेत ?’’ डोळ्यांवरचा काळा चश्मा ठीक करत काका म्हणाले.

‘‘हे बघा इकडे आहेत.’’ मिनूने ओढतच काकांना झेब्रा क्रॉसिंगजवळ आणले.

‘‘शाबास ! आता पलीकडे जाताना आणखी एक काळजी घ्यायची’’, काका सांगत होते. ‘‘दोन्ही बाजूंनी येणारी वाहनं नीट पाहायची. आधी उजवी बाजू पाहायची. मोटार, स्कूटर येत नसेल तर पुढे जायचं. मग अर्ध्या रस्त्यातून दुसऱ्या बाजूनं येणारी वाहनं पाहायची. त्यांच्याकडे नीट लक्ष देत आपलं पाऊल उचलायचं. समजलं ?’’

‘‘हो !’’ म्हणून मिनूने खुशीत मान डोलावली.

‘‘आणखी एक करायचं.’’

''काय ?''

''रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही.''

''समजलं मला. चला ना आता.''

''अंहं. एकदम नाही. आधी नीट बघ उजव्या हाताला आणि मला सांग एखादी गाडी येते का ते !''

''उजव्या हाताला ना ? त्या पहा दोन कार येत आहेत अन् स्कूटर तर भरधावच आहे.''

''मग थांब... आता? गेल्या ना त्या ?''

''हो. आता कोणी नाही इकडे. एक गाडी येते आहे, पण ती खूप दूर आहे.''

''वा ! मग चल तर.''

दोघांनीही अर्धा रस्ता पार केला. मग काकांनी परत तिला असेच प्रश्न विचारले अन् रस्ता मोकळा सापडताच दोघेही पलीकडे आली. पलीकडे येताच मिनूने जोरात टाळ्या वाजवल्या. ती फार खुशीत होती.

''वा ! तुम्ही किती चांगले आहात काका ! किती छान शिकवलं तुम्ही मला ! आता रस्ता क्रॉस करताना मला नाही भीती वाटणार... काका, आता मी जाऊ घरी?''

''जा बेटा. पण नीट जाशील नं ?''

''हो अगदी नीट जाईन. तो बघा टीव्ही काढलाय तिकडे माझं घर आहे. दिसलं ना ?'' मिनू विचारत होती. काकांनी मान उंचावली.

''तिकडे नाही हो. इकडे – या बाजूला.'' हाताला धरून काकांना तिरपे वळवत मिनू म्हणाली.

''आता दिसला ना?''

''हो.'' म्हणून काकांनी खुशीने मान हालवली.

''आता मी जाते हं.''

''जा बेटा, नीट सांभाळून जा.''

''वा ! नीट जायला तर तुम्हीच शिकवलं मला काका. मी सांगते आईला. अच्छा ! ठीक आहे.''

''बाय मिनू.'' काकांनी हात उंचावून हालवला. कितीतरी वेळ ते हात हालवतच होते.

कोणाचा तरी धक्का लागला. काका भानावर आले. डोळ्यांवरचा काळा चश्मा काढला. खिशातल्या रुमालाने एकदा त्यांनी आपले डोळे टिपले. मग समोरून येणाऱ्या माणसाची चाहूल लागली. ते आर्जवाने म्हणाले, ''मला दिसत नाही, पलीकडे पोहोचवता का ?''

समोरच्या माणसाने त्यांचा हात पकडला अन् त्याच्या मागोमाग 'काका' निमूटपणे चालायला लागले.

**– शैलजा काळे**

**शब्दार्थ :** **इवलीशी** – लहानशी. **आर्जव** – विनंती. **गलबलून येणे** – मन भरून येणे. **चाहूल लागणे** – कुणीतरी येण्याची जाणीव होणे. **निमूटपणे** – गुपचूप, काहीही न बोलता.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) मिनू कशाला घाबरत होती ?

(आ) मिनूला दररोज शाळेत कोण पोहोचवत असे ?

(इ) रस्त्यावरील पांढऱ्या पट्ट्यांना काय म्हणतात ?

(ई) 'मिनूला रस्ता ओलांडायला मदत करणाऱ्या काकांना दिसत नव्हते.' हे पाठातील कोणत्या वाक्यावरून कळते ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) आई किंवा बाबांचं बोट धरलं, की भीती ........... .

(आ) माझं नाव आहे ................. , पण सगळे मला मिनू म्हणतात.

(इ) मिनूच्या आवाजातल्या ................. काकांना गलबलून आले.

(ई) आता रस्ता क्रॉस करताना मला नाही ................. वाटणार.

**प्र. ३. कोण, कोणाला म्हणाले ?**

(अ) "मग आज नाही आला तो ?"

(आ) "रस्त्यातून कधीही धावत सुटायचं नाही."

(इ) "तिकडे नाही हो. इकडे, या बाजूला."

**प्र. ४. पाठात आलेल्या इंग्रजी शब्दांना मराठीत काय म्हणतात ते लिहा.**

(अ) प्लीज (आ) क्रॉस (इ) टीव्ही

**प्र. ५. स्वत:ला दिसत नसूनही काकांनी मिनूला रस्ता ओलांडायला कशी मदत केली ते पाच-सहा वाक्यांत लिहा.**

**प्र. ६. खालील प्रश्नांची उत्तरे सांगा.**

(अ) काकांनी मिनूला मदत केली, तशी तुम्ही कोणाकोणाला मदत केली ? कशी मदत केली ?

(आ) अंध व्यक्ती, मुले-मुली स्वत:ची कामे स्वत: करतात, म्हणजे ते स्वावलंबी असतात. तसे तुम्ही स्वावलंबी आहात का ?

असल्यास – तुम्ही स्वत:ची कोणकोणती कामे स्वत: करता ?

नसल्यास – स्वावलंबी होण्यासाठी तुम्ही काय काय कराल ?

**प्र. ७. तुम्ही कधी भीतिदायक सिनेमा पाहिला आहे का ? चौथीतल्या जिग्नेशने असा एक सिनेमा पाहिला. तो सिनेमा पाहताना त्याला काय वाटले ते त्याने लिहिले आहे. कंसातील योग्य शब्द वापरून त्याचे लेखन पूर्ण करा.**

(कानाचा, घसा, श्वास, डोळे, कानठळ्या, छाती, जीव, पाय)

सिनेमाच्या सुरुवातीला अगदी शांत रस्त्यावर एक मुलगा चाललेला होता. सगळं इतकं शांत होतं की आपल्या ....... घेण्याचाही आवाज यावा आणि एकदम एक......... बसवणारी किंकाळी ऐकू आली. ...... पडदा फाटतो की काय असं वाटलं. सिनेमात एक भली मोठ्ठी घार उडत आली आणि त्या छोट्या मुलाच्या अगदी जवळून गेली. माझी ......... जास्त जोरात धडधडू लागली. आई-बाबांच्या मधे बसून मी सिनेमा पाहत होतो, पण तरीही .... कोरडा पडला. मध्यंतराआधीचे गुहेतल्या पाठलागाचे दृश्य पाहून तर .... लटलटा कापू लागले. भीतीने ..... पांढरे पडू लागले, पण सिनेमा पाहायचाच होता. हे सगळं पडद्यावर चालतंय, काल्पनिक आहे हे माहिती होतं. तरीही मध्यंतर होईपर्यंत मी ............. मुठीत घेऊन बसलो होतो.

**प्र. ८. खालील प्रसंग तुमच्यावर कधी आले होते का ? त्या वेळी तुम्हांला काय वाटले ? तुम्ही काय केले ?**

(अ) रस्त्यावरून चालताना एखादे वाहन पाठीमागून भर्रकन आले, जवळून गेले.

(आ) रस्ता ओलांडताना एखाद्या अनोळखी माणसाने तुमचा हात पकडला. तुम्हांला त्याच्याबरोबर चालायला सांगितले.

**उपक्रम :**

१. तुमच्या परिसरातील मूकबधिर/अंध शाळेला भेट द्या. माहिती मिळवा. वर्गात सांगा.

२. तुमच्या आईला काम करताना पाहून तुमच्या मनात काय येते, ते वर्गात सांगा.



**वाचा.**

**मावशी** : अरे राजू, मोटारीनं तुला धडक दिली म्हणे.

**राजू** : हो. त्या वेळी मी रस्त्यावरचा फलक वाचत होतो.

**मावशी** : काय लिहिलं होतं त्या फलकावर?

**राजू** : रस्त्यावरचे अपघात टाळण्याचे उपाय !

# १३. चवदार तळ्याचे पाणी

• ऐका. म्हणा. वाचा.

चवदार तळ्याचे पाणी,
नवशक्ति मानवा आणी.

या शक्तीमागे मूर्ती,
भीमकाय देई स्फूर्ती,
जणू मुक्यास दिधली वाणी,
चवदार तळ्याचे पाणी.

तेजाब जलाचे झाले,
दीनांना प्रेरित केले,
अन्यायासाठी लढुनी,
नवशक्ति मानवा आणी.

नाकारुन परंपरेला,
स्वीकारुन मानवतेला,
करुणेची आर्त विराणी,
चवदार तळ्याचे पाणी.

आत्मभान जागे केले,
मानवास मीपण दिधले,
धम्मचक्र ये परतोनी,
नवशक्ति मानवा आणी.

चवदार तळ्याचे पाणी,
नवशक्ति मानवा आणी.

**– अनुराधा साळवेकर**



*चित्रकार-श्री. सुंदर लाल. शांतिस्वरूप बौद्‌ध, सम्यक प्रकाशन, नवी दिल्ली-६३, यांच्या सौजन्याने.*

**शब्दार्थ :** **दिधली** – दिली. **तेजाब** – एक तीव्र रसायन, आम्ल. शरीराच्या ज्या भागावर पडेल, त्या भागाला इजा होते. **आर्त** – व्याकूळ करणारी. **विराणी** – दु:खी गाणे. **आत्मभान** – स्वत:बद्‌दची जाणीव.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) चवदार तळ्याच्या पाण्याने कोणाला नवीन शक्ती दिली ?

(आ) चवदार तळ्याच्या पाण्यातील शक्तीमागे कोणाची स्फूर्ती आहे ?

(इ) चवदार तळ्याच्या पाण्याने कोणाला प्रेरित केले ?

**प्र. २. थोडक्यात उत्तरे लिहा.**

(अ) 'अन्यायासाठी लढुनी' असे कवयित्री का म्हणते ?

(आ) आत्मभान कशामुळे जागे होते ?

**प्र. ३. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(नाकारायचे, स्वीकारायचे, लढायचे, प्रेरित करायचे, जागे करायचे)

(अ) दीनांना ............... .

(आ) मानवतेला ............... .

(इ) अन्यायाविरुद्ध............... .

(ई) परंपरेला............... .

(उ) आत्मभान ............... .

**प्र. ४. जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) भीमकाय | (अ) लढा |
| (२) मुक्यास | (आ) स्फूर्ती |
| (३) दीनांना | (इ) नकार |
| (४) अन्यायविरोधी | (ई) वाणी |
| (५) परंपरेला | (उ) प्रेरणा |

**प्र. ५. समानार्थी शब्द द्या.**

(अ) पाणी (आ) वाणी (इ) शक्ती (ई) दीन

**प्र. ६. खालील शब्दांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) स्फूर्ती (आ) दीन (इ) मानवता (ई) शक्ती (उ) दिन

**प्र. ७. 'ता' प्रत्यय लावून नवीन शब्द लिहा.**

उदा., मानव – मानवता.

(अ) सुंदर (आ) मधुर (इ) नादमय

**उपक्रम :**

१. समाजसुधारकांच्या चित्रांचा संग्रह करा.

२. तुमच्या गावातल्या पाणवठ्यांविषयी माहिती सांगा.



**चला, वाचूया.**


## चवदार तळ्याचा सत्याग्रह

रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यात 'चवदार तळे' नावाचे एक तळे आहे. स्वातंत्र्यापूर्वी या तळ्यावर इतर ठिकाणांप्रमाणे दलितांना पाणी भरण्याची बंदी होती. 'सर्व लोकांना पाणी मिळावे' असा कायदा करूनही जातिभेदांमुळे दलितांना चवदार तळ्याच्या पाण्याला हात लावण्याची देखील मनाई होती.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या जुलमी रूढीचा धिक्कार केला. 'चवदार तळे' सर्वांना खुले व्हावे, म्हणून त्यांनी महाड येथे सत्याग्रह केला. हजारो लोकांच्या उपस्थितीत २० मार्च १९२७ रोजी डॉ. आंबेडकरांनी स्वतः तळ्याचे पाणी पिऊन एक अन्यायी परंपरा संपवली. दलितांबरोबर सवर्ण सुधारक देखील या लढ्यात सहभागी झाले होते. अस्पृश्यता पाळणे, माणसांनी एकमेकांना हीन लेखणे अशा विषमतेच्या परंपरांना डॉ. आंबेडकरांनी संघटित विरोध केला. स्त्रियांना, दलितांना समतेने, समानतेने जगण्याचा हक्क मिळावा म्हणून त्यांनी आयुष्यभर अपार संघर्ष केला. 'चवदार तळे' ही जागा अशाच एका प्रसंगाची साक्षीदार आहे.

'चवदार तळ्याचा सत्याग्रह' ही घटना भारताच्या इतिहासातील एक प्रेरणादायी घटना मानली जाते.

- **गोलातील शब्द वाचा. शब्दांतील संबंध समजून घ्या. 'निसर्ग आपला सोबती' या विषयावर आठ ते दहा ओळींत निबंध लिहा.**



# १४. मिठाचा शोध



फार फार वर्षांपूर्वीची ही गोष्ट आहे. इतक्या पूर्वीची, की त्या काळी माणूस जंगलामध्ये गुहेत राहत असे आणि कंदमुळं खाऊन पोट भरत असे. शिकार करून प्राण्यांचं मांस खात असे. त्याला अन्न शिजवून किंवा भाजून खाणं, हे माहीत नव्हतं. इतकंच काय, पण तो कंदमुळं खात असे तीही तशीच अळणी म्हणजे मिठाशिवायच. आज आपण एखादा पदार्थ मिठाशिवाय खाऊ शकणार नाही; पण त्या काळी मीठ म्हणजे काय हेही त्याला ठाऊक नव्हतं.

एके दिवशी असंच जंगलामध्ये भटकताना एका आदिमानवानं काही हरणांना ठरावीक जागी एका झाडाच्या बुंध्यापाशी असणाऱ्या दगडांना चाटताना बघितलं. बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं निरीक्षण केलं. त्याला खूप आश्चर्य वाटलं. मग त्याच्या मनात कुतूहल जागृत झालं. 'काय असेल बरं हे ? ही हरणं रोज का बरं या जागी हे दगड चाटतात? आपणही बघूयात का चाटून ?'

त्याच्या मनात शंका आली आणि लगेच शंकेचं समाधान करण्यासाठी त्यानं तेच दगड चाटून पाहिले, तर काय ! एक वेगळीच, पण मजेदार चव त्याच्या जिभेवर रेंगाळायला लागली. त्याला ती खूप आवडली. तो रोज त्या जागी येऊन तो दगड चाटू लागला.

तो दगड म्हणजे काय होतं हे माहीत आहे का तुम्हांला ? तो होता खनिज मिठाचा दगड. खनिज मीठ म्हणजे ज्याला आपण 'सैंधव मीठ' म्हणतो.

त्यानंतर त्याला एक युक्ती सुचली. त्या दगडाचे त्यानं तुकडे केले. ते तुकडे आपल्या गुहेत नेऊन ठेवले आणि कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा दगड चाटू लागला. त्याला आता जेवणात खूप मजा येऊ लागली. हाच दगड फळं खातानाही तो चाटू लागला. असे खूप दिवस गेले आणि एके दिवशी ते तुकडे संपले. मग त्यानं आधीच्या जागेवरून आणखी दगड आणले; पण त्या दगडांना पूर्वीची चव नव्हती. मग त्या आदिमानवाला पुन्हा बेचव, अळणी जेवण खाणं भाग पडू लागलं. आता त्याला शांतपणे बसून राहवेना. त्या दगडाचा शोध घेण्याचा त्यानं खूप प्रयत्न केला; पण तो दगड काही त्याला मिळाला नाही. आता काय बरं करावं ! असा विचार करताना चालत चालत तो त्या जंगलाच्या टोकापाशी म्हणजे जिथे जंगल संपतं अशा जागेवर येऊन ठेपला.

त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची माती. ती खूप लांबवर पसरलेली होती आणि त्या मातीनंतर पाणीच पाणी खूप लांबवर पसरलं होतं, की तिथे जाणं शक्यच नव्हतं. त्याला पुन्हा कुतूहल वाटलं.

ते लांबवर पसरलेलं पाणी म्हणजे होता अथांग समुद्र आणि ती वेगळ्या प्रकारची माती म्हणजे वाळूनी भरलेला समुद्राचा किनारा, जो या आदिमानवानं प्रथमच पाहिला होता.

तो चालत चालत त्या समुद्राच्या पाण्यात गेला आणि काय आश्चर्य ! ते पाणी त्याच्या हातापायांना झोंबू लागलं. का, माहीत आहे ? आदिमानवाच्या हातांना आणि पायांना बरंच खरचटलं होतं. जंगलातले काटेकुटे, दगड यांमुळे पायांना बऱ्याच जखमाही झाल्या होत्या. त्यामुळे समुद्राच्या पाण्यामुळे झोंबणं सुरू झालं. त्याला आश्चर्य वाटलं, कारण नदीचं पाणी तर त्याला माहीत होतं, पण ते असं कधी अंगाला झोंबलं नव्हतं. मग पुन्हा त्यानं त्यावर विचार करायला सुरुवात केली. त्यानं थोडं पाणी पिऊनही पाहिलं आणि काय आश्चर्य ! ती चव त्याला ओळखीची वाटली. त्याला खूप आनंद झाला. खनिज मिठाचा जो दगड त्यानं चाटला होता, तशीच चव या पाण्याची होती.

मग त्यानं विचार केला. जेवण म्हणजे कंदमुळं. ती खाताना मधूनमधून हे पाणी प्यायलं तर? पण ते काही त्याला जमेना. ती चव त्याला हवी होती. ते पाणी त्याच्या गुहेपर्यंत नेणंही त्याला शक्य होत नव्हतं. 'काय बरं करावं !' मग पुन्हा त्यानं विचार करायला सुरुवात केली.

त्याला एक युक्ती सुचली. त्यानं समुद्रकिनाऱ्यावर जरा लांब एक खड्डा खणला. त्यात समुद्राचं पाणी साठवलं. मग उन्हामुळे त्या पाण्याची वाफ झाली आणि त्या पाण्यातले क्षार म्हणजे सध्याचं आपण खातो ते मीठ, त्या खड्ड्याच्या तळाशीच राहिलं. मग त्या आदिमानवाला ते सहज आपल्या गुहेत नेता आलं. यानंतर आदिमानवाच्या जेवणाला मस्त चव आली !

(काल्पनिक) **– अंजली अत्रे**

**शब्दार्थ :** **अळणी** – मिठाशिवाय बनवलेले व चव नसलेले. **कुतूहल** – उत्सुकता, एखादी गोष्ट जाणून घेण्याची इच्छा. **युक्ती** – कल्पना.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पूर्वीच्या काळी माणूस कुठे राहत असे ?
(आ) आदिमानवाने हरणांच्या कोणत्या गोष्टीचे खूप दिवस निरीक्षण केले ?
(इ) खनिज मिठाला आपण काय म्हणतो ?
(ई) माणसाने समुद्राचे पाणी कशात साठवले ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) बरेच दिवस त्यानं या गोष्टीचं ............. केलं. त्याला खूप ............ वाटलं.
(आ) कंदमुळं खाताना रोज थोडा थोडा .................. चाटू लागला.

(इ) त्याला दिसली एक वेगळ्या प्रकारची ............ .
(ई) ते पाणी त्याच्या ................ नेणंही त्याला शक्य होत नव्हतं.

**प्र. ३. का ते सांगा.**

(अ) आदिमानवाने दगड चाटून पाहिला.
(आ) समुद्राचे पाणी आदिमानवाच्या हातापायांना झोंबू लागले.
(इ) समुद्रकिनाऱ्यावर आदिमानवाने लांब खड्डा खणला.

**प्र. ४. तुमचे अनुभव लक्षात घेऊन सारणीत योग्य नावे लिहा.**

| कच्चे खाल्लेले पदार्थ | भाजून खाल्लेले पदार्थ | शिजवून खाल्लेले पदार्थ |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**प्र. ५. कोणकोणते पदार्थ कच्चे खाणे अधिक चांगले असते, याविषयी माहिती मिळवा.**

**प्र. ६. हा खेळ खेळा. डोळ्यांवर रुमालाची पट्टी बांधा. नाकाने वास घ्या. पदार्थ ओळखा. त्यांची चव कशी असते ते लिहा. उदा.,** मिरची – तिखट.


**प्र. ७. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) जंगल
(आ) झाड
(इ) लांब
(ई) दिवस
(उ) समुद्र
(ऊ) पाणी

**प्र. ८. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) निरीक्षण करणे. (आ) कुतूहल वाटणे. (इ) अंगाला झोंबणे.

**प्र. ९. 'मीठ' या शब्दासोबत बाणाने दाखवलेला एक-एक शब्द घेऊन वाक्प्रचार तयार करा. त्याचा अर्थ समजावून घेऊन वाक्यात उपयोग करा.**




**शिक्षकांसाठी :** या कथेत एका आदिमानवाचा उल्लेख आलेला आहे; पण मिठाचा शोध एकाच आदिमानवाने लावला, असा त्याचा अर्थ घेऊ नये. माणसाच्या अन्नघटकांचा शोध पिढ्यान्‌पिढ्या चालू राहिला, हे विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.

## निमंत्रण पत्रिका

- **वाचा**

पाळंदूरच्या शाळेतल्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनाला भेट देण्यासाठी गावकऱ्यांना निमंत्रण दिले आहे. ग्रामपंचायत कार्यालयाजवळच्या सूचना फलकावर चौथीच्या मुलांनी काय लिहिले आहे ते काळजीपूर्वक वाचा.

### जाहीर निमंत्रण

**पाळंदूरमधील सर्व लोकांसाठी**

दरवर्षीप्रमाणे आपल्या शाळेत, म्हणजे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर येथे 'मुलांचा दिवस' या उपक्रमाअंतर्गत प्रदर्शनीचे आयोजन केले आहे. इयत्ता पहिली ते चौथीच्या मुलांनी बनवलेल्या विविध वस्तू व भेटकार्डे, रेखाटलेले तक्ते, मातीकाम, चित्रे आणि शाळेच्या बागेत फुलवलेल्या भाज्या व फळे यांची प्रदर्शनी भरवली जाणार आहे. या कार्यक्रमासाठी लाखनीवरून 'विदर्भ आनंदशिक्षण मंडळा'चे कार्यकर्ते श्री. बालसू नागोटी आणि श्रीमती सुवर्णाताई गजभिये उपस्थित राहणार आहेत. ते कलाकुसरीच्या वस्तू बनवण्याचे प्रात्यक्षिक दाखवतील. तरी आपण सगळ्यांनी उपस्थित राहून आमचा उत्साह वाढवावा, ही विनंती.

**शनिवार, दि. ....................**

**ठिकाण**
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पाळंदूर.

**प्रदर्शनीची वेळ :** सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.००

**प्रात्यक्षिक :** सकाळी ११.३० ते दुपारी १.३०

**✻ खास आकर्षण ✻**
**गेल्या वर्षीच्या सहलीची वैशिष्ट्यपूर्ण छायाचित्रे.**

आपले
**सर्व विद्यार्थी, इयत्ता चौथी**
**जि.प.प्रा. शाळा, पाळंदूर.**

**शिक्षकांसाठी :** १. येथे जाहीर निमंत्रण पत्रिकेचा नमुना दिला आहे. तो शिकवताना जवळच्या एखाद्या शनिवारचा दिनांक घालून शिकवावे. २. पाळंदूर भागात 'प्रदर्शन' या शब्दासाठी 'प्रदर्शनी' हा शब्द वापरतात.

## स्वाध्याय

**प्र. १. निमंत्रण पत्रिका काळजीपूर्वक वाचा. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(अ) निमंत्रण कोणी दिले आहे ?

(आ) कार्यक्रमाचे स्वरूप काय आहे ?

(इ) कार्यक्रमासाठी पाहुणे कोठून येणार आहेत ?

(ई) या निमंत्रणाला 'जाहीर निमंत्रण' असे का म्हटले आहे ?

(उ) असा कार्यक्रम पाळंदूरच्या शाळेत गेल्या वर्षी झाला असेल का ? ते कशावरून समजले ?

(ऊ) निमंत्रण वाचून प्रियंकाची आई म्हणाली, ''बरं झालं. दिवसभर शाळेत थकली, तरी मुलांना दुसऱ्या दिवशी विश्रांती मिळेल.'' त्या असे का म्हणाल्या असतील ?

(ए) समजा, असे प्रदर्शन तुमच्या शाळेत भरवायचे आहे. त्यासाठी काय काय तयारी करावी लागेल ? आपापसात तसेच शिक्षकांशी चर्चा करून उत्तर लिहा.

(ऐ) तुम्हांला असे निमंत्रण गावकऱ्यांना द्यायचे असेल, तर तुम्ही 'खास आकर्षण' म्हणून काय काय लिहाल ?

**प्र. २. प्रदर्शनामधील खालील प्रसंगांमध्ये मुले काय बोलत आहेत, याची कल्पना करून उत्तरे लिहा. गरज वाटल्यास शिक्षकांशी चर्चा करा.**

(अ) प्रदर्शन पाहून आलेली रत्ना तिच्या आजीला प्रदर्शनाविषयी सांगते आहे.

(आ) प्रदर्शन सुरू झाल्यावर तासाभराने खूप गर्दी झाली. काही लोक मधेच घुसू लागले. त्यांनी रांगेत येऊन प्रदर्शन पाहावे, म्हणून राकेश सूचना देतोय.

(इ) सविता प्रमुख पाहुण्यांना प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यासाठी विनंती करते आहे.

(ई) कलाकुसरीच्या वस्तूंच्या प्रात्यक्षिकाच्या वेळी सुवर्णाताईंनी मुलांना सहा-सहाचे गट करायची सूचना दिली.

- **खालील चित्रांमध्ये काय योग्य, काय अयोग्य ते सांगा.**



# १५. आनंदाचं झाड

आमच्या शेवग्याला सुंदर, हिरवट पोपटी नाजूक पालवी फुटली होती. झाड जोमानं उंच उंच वाढत होतं. नाजूक पानांची हिरवी नक्षीदार जाळी पसरली होती. काही फांद्यांना मोहोर फुलला होता. पांढऱ्या रंगाच्या फुलांचे घोसच्या घोस झाडांवर लोंबत होते. हिरव्यागार झाडाला पांढऱ्याशुभ्र फुलांचा फुलोरा उठून दिसत होता. आमचा शेवगा खूप छान बहरला होता. येणाऱ्या-जाणाऱ्यांची नजर त्यावर पडल्याशिवाय राहत नव्हती. एके दिवशी आमच्या घरी शेजारच्या काकू आल्या अन् म्हणाल्या, ‘‘दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.’’

इतकं सुंदर झाड अन् तोडून टाका ! मला जरा त्या काकूंचा रागच आला. मी काही म्हणायच्या आतच आई म्हणाली, ‘‘झाडं ती, सगळी सारखीच. उलट झाडं किती परोपकारी असतात. ती का बरं आपल्यात भांडणं लावतील? आपण माणसंच असा विचार करतो. झाडं तर आपल्याला फळं देतात, फुलं देतात, सावली देतात, पक्ष्यांना घरं देतात. आधार देतात. मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.’’



काकू म्हणाल्या, ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

आई म्हणाली, ''नेऊ देत नेल्या तर. खाण्याचीच वस्तू ती. झाडांना त्या शेंगा फक्त आमच्यासाठीच नाही लागल्या. झाडाला शेंगा असेपर्यंत लोकांचं लक्ष झाडाकडे जाणारच.''

हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर रंगीबेरंगी पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता. आमचा शेवगा म्हणजे माझ्यासाठी निसर्गाचा अनमोल ठेवा.

या शेवग्यामुळेच मला विविध पक्ष्यांची अगदी जवळून ओळख झाली. त्या पक्ष्यांचे विविध आकार; देखणे, मोहक रंग; लयदार लकबी, गोड आवाज, त्यांच्या मजेदार हालचाली, त्यांची दिनचर्या इत्यादी कळली.

आमच्या शेवग्याच्या पांढऱ्याशुभ्र फुलांच्या घोसांवर रुंजी घालत गुंजारव करणाऱ्या जांभळट-काळ्या टपोऱ्या भुंग्याची व माझी भेट झाली. फुलांमधला मध पिऊन फुलांभोवती नाचणाऱ्या मधमाश्या मी पाहिल्या शेवग्यामुळे. अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ फुलचुख्यांची झुंबड मला दिसली. मधानं गच्च भरलेल्या फुलांतून हवेत अलगत मध चोखण्याची कला पाहावी ती फुलचुख्यांची. इटुकला बोटभर फुलचुख्या असतो मात्र कसरतपटू. एरवी मला कधीच दिसला नसता, फक्त आवाजच ऐकून होते, तो तांबट पक्षी मनमुरादपणे मान खाली-वर करत, अगदी एकाग्रतेनं तुक्तुक् आवाजाचा टणत्कार करताना मला चक्क दिसला. भर उन्हात शेवग्याच्या उंच उंच फांदीच्या शेंड्यावर कोकीळ पक्षीही शांतपणे झुलताना मी पाहिला. छोटे छोटे हिरव्या राघूंचे थवेच्या थवे अलगत उडत उडत, हवेत तरंगत कधी किडे तर कधी परागकेशरांचा फन्ना उडवताना पाहिलं.

राघू हवेत तरंगत शिकार करण्यात अगदीच पटाईत. सर्व ऋतूंमध्ये विविध पशु-पक्षी, कीटक-किड्यांचं 'आमचा शेवगा' हे माहेर बनलं होतं. वाळलेल्या शेंगांच्या बियांच्या मेजवानीसाठी पोपटांची नियमित हजेरी लागे. पोपटांचा हिरवागार रंग, लांबसडक शेपूट अन् नखरेबाज हालचाल मी अगदी जवळून पाहिली. बुलबुल पक्ष्याच्या सुरेल ताना मी आमच्या शेवग्यामुळेच ऐकू शकले. चिमण्यांची अखंड चिवचिव अन् साळुंक्यांची एकसारखी किलकिल, अगदी कान किट्ट करणारी, मी जवळून ऐकली. हिवाळ्यात तर खंड्या नियमित हजेरी लावू लागला. एरवी मी खंड्याला चित्रातच पाहिलं होतं. खंड्याचा तो देखणा मोरपंखी निळा रंग अन् रूप, बाकदार मोठी चोच, त्याची एकाग्रता अन् किलकिल आवाज करत सुळकी मारण्याची कला मला दाखवली, ती शेवग्यानं.

वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा शेवगा उभा आहे. माझा तो आवडता मित्र आहे. मी त्याची खूप निगा राखते. तो अजबखाना आहे. त्यानं मला किती किती सुंदर पक्षी, किडे, कीटकांची ओळख करून दिली. त्यानं माझं मनोरंजन तर केलंच, पण ज्ञानही दिलं, आनंदही दिला. शेवग्याची पानं मला खूप खूप आवडतात. किती सुरेख, झिरमिर हिरवीगार पानं. शेवग्याचा फुलोरा, पांढराशुभ्र रंग हा पक्ष्यांप्रमाणे माणसांचंही मन मोहित करतो. आपल्या हिरव्या रंगानं तो माझं मन प्रसन्न करतो. रोज नवीन उत्साह माझ्यात निर्माण करतो. त्याच्या अंगाखांद्यावर पक्ष्यांचा उत्साह बहरलेला असतो. हा पठ्ठा शेवगा आनंदानं झुलत डुलत त्यांना साद घालत असतो आणि या आनंद उत्सवात मीही सहभागी होते अन् नाचू लागते. गाऊ लागते.

**- लीला शिंदे**

**शब्दार्थ :** **फुलोरा** – फुलांचा बहर. **रुंजी घालणे** – भोवती फिरणे. **मनमुरादपणे** – मनसोक्तपणे. **फन्ना उडवणे** – खाऊन टाकणे.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) शेवग्याच्या झाडावर कोणत्या रंगाच्या फुलांचे घोस लोंबत होते?
(आ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर कोणाचा मेळा भरत असे?
(इ) पशुपक्षी, कीटक-किड्यांचे माहेर कोणते?

**प्र. २. तीन-चार वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) झाडे आपल्याला काय काय देतात?
(आ) शेवग्यामुळे लेखिकेला पक्ष्यांच्या कोणकोणत्या गोष्टींची ओळख झाली?
(इ) लेखिकेला शेवग्याने काय काय दिले?

**प्र. ३. कोण, कोणास म्हणाले ?**

(अ) ''दारात कधीही शेवगा लावू नये. घरात भांडणं होतात. हे झाड तुम्ही तोडून टाका.''
(आ) ''मी हे झाड लावलं ते जोपासण्यासाठी, तोडण्यासाठी नाही.''
(इ) ''अहो, लोक शेंगा तोडून नेतील, तेव्हा नाही का भांडणार तुम्ही ?''

**प्र. ४. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) हिरव्यागार पसरलेल्या फांद्यांवर .............. पक्ष्यांचा अखंड मेळा भरत होता.
(आ) अलगत हवेत तरंगत इवल्या इवल्या चपळ .............. झुंबड मला दिसली.
(इ) वेगवेगळ्या ऋतूंमध्ये वेगवेगळी रूपं घेत आमचा .............. उभा आहे.

**प्र. ५. शेवग्याच्या झाडावर येणाऱ्या विविध पक्ष्यांची नावे पाठात आली आहेत. त्यांची यादी करा.**

**प्र. ६. 'कार' प्रत्यय जोडून नवीन शब्द बनवा.**

**उदा.,** गीत – गीतकार.

(अ) संगीत (आ) चित्र (इ) नाटक (ई) कला

**प्र. ७. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.**

(अ) परोपकार करणे. (आ) आधार देणे. (इ) फन्ना उडवणे. (ई) रुंजी घालणे.
(उ) सुळकी मारणे.

**प्र. ८. शेवग्याच्या शेंगांपासून कोणकोणते पदार्थ बनवतात ? त्यांतल्या कोणत्याही एका पदार्थाची कृती आई-बाबांना विचारून लिहा. उदा.,** शेवग्याचं पिठलं.

**उपक्रम :** तुमच्या जवळच्या एखाद्या झाडावर कोणकोणते पक्षी जमतात, त्यांचे निरीक्षण करा. त्यांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.

# १६. झुळूक मी व्हावे

- **ऐका. म्हणा. वाचा.**



वाटते सानुली मंद झुळुक मी व्हावे,
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे.

कधि बाजारी तर कधी नदीच्या काठी,
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी.
हळु थबकत जावे कधि कानोसा घेत,
कधि रमत गमत वा कधी भरारी थेट.



लावून अंगुली कलिकेला हळुवार,
ती फुलुनि बघे तो व्हावे पार पसार.
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा,
तो दिशादिशांतुनि फिरता उधळुनि द्यावा.

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर,
झुळझूळ झऱ्याची पसरावी चौफेर.
शेतांत पाचुच्या, निळ्या नदीवर शांत,
खुलवीत मखमली तरंग जावे गात.

**– दा. अ. कारे**



**शब्दार्थ :** **सानुली** – लहानशी. **स्वैर** – मोकळेपणा. **राईत** – दाट झाडीत, बागेत. **कानोसा घेणे** – कान देऊन लक्षपूर्वक ऐकणे. **अंगुली** – बोट. **पसार होणे** – निघून जाणे. **संगे** – बरोबर. **लकेर** – गाण्याची तान.

## स्वाध्याय

### प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.

(अ) कवीला काय व्हावेसे वाटते ?

(आ) कळीला कसे बोट लावावे, असे कवीला वाटते ?

(इ) दिशादिशांतून कवी काय उधळून देतो ?

(ई) कवीने शेताला कशाची उपमा दिली आहे ?

(उ) तुम्हांला काय व्हावेसे वाटते ?

### प्र. २. खालील अर्थाला अनुरूप कवितेतील ओळी लिहा.

(अ) जिकडे मन आकर्षले जाईल, तिकडे अगदी मोकळेपणाने जावे.

(आ) जाता जाता सुगंध उधळत जावे.

(इ) झऱ्याचे झुळझुळ गाणे सर्वत्र पसरावे.

(ई) हिरव्यागार शेतात किंवा निळ्याशार नदीच्या काठावर जावे.

### प्र. ३. कंसातील योग्य शब्द वापरून वाक्ये लिहा.

(पसार झाले, झुकली, कानोसा घेतला, भरारी घेतली)

(अ) घरात कोणी आहे का याचा मी ...........

(आ) मांजरीला पाहून उंदीर .............

(इ) नदीतल्या पाण्यावर झाडाची फांदी ............

(ई) पक्ष्याने आकाशात ............

### प्र. ४. रिकाम्या जागी तुमच्या मनाने शब्द भरून कविता पूर्ण करा.

वाटते मला ............... ............... मी व्हावे.<br>
घेईल ओढ मन ............... ............... झुकावे.<br>
कधी ............... तर कधी ............... काठी<br>
............ कधी वा ............ ........... पाठी.

**उपक्रम :** खालील झाडांच्या पानांचे निरीक्षण करा व वैशिष्ट्ये लिहा.

केळी, नारळ, पिंपळ, तुळस, बेल, आवळा, कडुनिंब.

# १७. म्हणींच्या गमती



मे महिन्याच्या सुट्टीतला रविवार. दुपारची जेवणं आटपून मुलं खेळायला बाहेर पडली. मैदानावर पोचतायत तोवर चंदूची आई त्याला बोलवायला आली. ''अरे, ऊनबिन काय लागतंय का नाही? संध्याकाळचं खेळा की, आता चल घरी.'' 'येतो, येतो' म्हणून चंदू खेळत राहिला. पाठोपाठ संध्याची आई आली.

''अगं एऽऽऽ किती तापलंय बघ. वाळू पघळंल असं वाटतंय. पाचनंतर खेळा की.'' ती ओरडून गेली. मुलं पुन्हा लंगडी खेळू लागली. थोड्या वेळात हितेशचे बाबा आले. ''अरे मुलांनो, सकाळी अन् संध्याकाळी मैदानात खेळायचं. दुपारी कुणाच्यातरी घरी खेळा.'' ते सगळ्यांना म्हणाले. 'फक्त थोडा वेळ,' असं म्हणत हितेश लंगडी घालू लागला. तो चार पावलं गेला असेल, इतक्यात अमीनाचे दादू म्हणजे आजोबा बोलवायला आले. वैतागलेली अमीना म्हणाली, ''काय हो दादू ? कुणीच मोठी माणसं खेळू देईनात. घरी चल, घरी चल करतायत. अशी कशी एकसारखी वागतात ती ?'' दादू हसून म्हणाले, ''बरोबर आहे बेटा. त्यांना काळजी वाटते तुमची. कुठेही गेलात तरी **पळसाला पानं तीनच** असतात.''



शाळेत खेळांच्या स्पर्धा सुरू होत्या. बाईंनी नेहमीप्रमाणे वर्गातल्या सगळ्या मुलांना भाग घ्यायला लावला होता. धावण्याची शर्यत सुरू झाली. सुरेश सोडला तर सगळी मुलं जोरात धावत होती. उत्तम चित्र काढणारा सुरेश मैदानी खेळांबाबत आळशी म्हणून प्रसिद्ध होता. साहजिकच तो सगळ्यांत शेवटी आला. धापा टाकत तो मुलांच्या घोळक्यात शिरला आणि म्हणाला, ''अरे, खरं तर मी पहिला आलो असतो, पण आपल्या मैदानावर लाल माती आहे.'' ''म्हणजे काय ?'' राजेशने आश्चर्याने विचारले. ''अरे, मी जोरात धावलो असतो, तर माझे पांढरेशुभ्र बूट मळले असते ना, म्हणून मी हळू धावलो.'' ''व्वा ! याला म्हणतात, **नाचता येईना अंगण वाकडं**.'' घोळक्यातली राजश्री पटकन म्हणाली.



रवी सकाळी लवकर सोपानच्या घरी आला. सोपानच्या घरातली म्हैस कालच व्याली होती, म्हणून खरवस खायला मिळेल असा रवीचा अंदाज होता. सोपान आणि त्याची चुलत भावंडं नाष्टा करत होती. प्रत्येकाच्या वाटीतला खरवस पाहून रवीच्या तोंडाला पाणी सुटलं. सोपानची काकू त्याला म्हणाली, ''रवी, चल रे. तूपण कर न्याहारी.'' ''नको काकू. मी खूऽऽप खाल्लंय.'' ''अरे, पण गूळ घातलेला खरवस तर घेशील की नाही ?'' ''नको. माझे दात दुखतायत.'' रवी म्हणाला. ''खरवसाला कशाला लागतात रे दात ? मला माहितीय तुला खरवस किती आवडतो ते. सोपान कालच म्हणाला होता, की तू येणार आहेस म्हणून. उगाच **ताकाला जाऊन भांडं लपवू नये**. चल, हात धुऊन ये.'' काकू हसत म्हणाली.

- वरील प्रसंगांमधील रंगीत शब्दसूमह नीट वाचा. उदा., **पळसाला पानं तीनच** म्हणजे कुठेही जा, परिस्थिती सारखीच आहे. सगळ्या मुलांना त्यांच्या घरचे लोक उन्हात खेळायला मनाई करतात, म्हणून **पळसाला पानं तीनच** असे म्हटले आहे.
आपल्या भाषेमध्ये असे अनेक शब्दसमूह वापरले जातात. त्यांना **म्हणी** असे म्हणतात.
आता उरलेले दोन्ही प्रसंग वाचून अधोरेखित म्हणींचा अर्थ शोधा. शिक्षकांशी, पालकांशी, मित्र-मैत्रिणींशी चर्चा करून आणखी म्हणी जमवा.

- **खालील चौकटींत लपलेल्या म्हणी शिक्षकांच्या मदतीने शोधा व त्यांचा अर्थ समजून घ्या.**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ए | स | ल | हा | न | तों | डी | मो | ठा | घा | स |
| मं | क | ग | हा | त | च्या | का | क | णा | ला | आ |
| ग | श | ना | वाँ | अ | ति | ति | थे | मा | ती | र |
| ळ | वा | र | ध | चे | पा | णी | सु | दि | व्या | सा |
| खा | ई | त्या | ला | ड | घ | प्या | ण | व | खा | क |
| प | र | म | ख | नि | भा | र | हे | ड | ली | शा |
| आ | प | लं | व | र | वा | रा | खा | ई | अं | ला |
| मां | ज | र | ख | ण | ठे | र | भ | ली | धा | ले |
| बि | न | बु | वे | आ | वा | का | अ | र | र | झा |
| श | हा | ण्या | ला | श | ब्दा | चा | मा | र | चिं | कू |
| घ | रो | घ | री | मा | ती | च्या | चु | ली | च | ध्या |

- **प्राण्यांची चित्रे पाहा. योग्य प्राण्याचे नाव गाळलेल्या जागी लिहून म्हणी पूर्ण करा.**







- आयत्या बिळात............ .
- वासरात लंगडी .......... शहाणी.
- ............ हाती कोलीत.







- पाण्यात राहून ............ वैर करू नये.
- ............ धाव कुंपणापर्यंत.
- ............ गेला नि झोपा केला.



- ............ मैदान जवळ आहे.
- ............ शेपूट नळीत घातले, तरी वाकडे ते वाकडेच.
- ............ गुळाची चव काय.







## आम्ही कथा लिहितो – २








**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना प्रत्येक चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय काय दिसते ते क्रमाक्रमाने विचारावे. सर्व चित्रांच्या मदतीने गोष्ट सांगण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.







* चित्रे पाहा. कोणती घटना घडली असेल, याची कल्पना करून ती गोष्ट वर्गात सांगा. सगळ्यांत शेवटी काय झाले असेल त्याचे चित्र वहीत काढा. गोष्टीला नाव द्या.

## आम्ही लेखन करतो

• **वाचा. समजून घ्या. उतारा पाहून अचूक लिहा. (विरामचिन्हांसह)**

राणी आजीला म्हणाली, ‘‘बघ ना आजी, आपला सोनू मला चिडवतो.’’ ‘‘अरे सोनू इकडे ये.’’ आजी म्हणाली. सोनू आजीकडे आला. ‘‘काय गं आजी ?’’ सोनू म्हणाला. ‘‘अरे तुम्ही दोघं बहीणभाऊ. मग आपल्या ताईला का चिडवतोस ?’’ आजी म्हणाली. ‘अस्सं आहे होय !’ सोनू मनाशीच म्हणाला. ‘‘अगं आजी आम्ही दोघं खेळतो एक तासभर. तू बघ कोण काय करतं ते. मग बोल मला. म्हणतात ना, हातच्या काकणाला आरसा कशाला ?’’ सोनू म्हणाला.

• **वाचा. समजून घ्या. कंसातील विरामचिन्हे योग्य ठिकाणी वापरून उतारा पुन्हा लिहा.**
**( , . ! ? ‘‘ ’’ )**

गांधीजींचे मित्र एकदा त्यांना भेटायला आले दोघांनी गप्पागोष्टी केल्या गांधीजींचे लक्ष मित्राच्या धोतराकडे गेले ते मित्राला म्हणाले अरे इतका श्रीमंत झालास पण तुझे धोतर फाटकेच मित्र म्हणाला अरे भाई श्रीमंतालाही काही अडचणी असतात गांधीजी म्हणाले फाटके धोतर नेसण्याइतकी काय अडचण आली मित्र म्हणाला नोकर काम करत नाहीत हे ऐकून गांधीजींनी लगेच त्याचे धोतर शिवून दिले हे पाहून तो श्रीमंत गृहस्थ गांधीजींना काय सांगायचे आहे ते समजून गेला.

**शिक्षकांसाठी :** हा उतारा श्रुतलेखनासाठी वापरावा. उतारा वाचून यात योग्य ठिकाणी योग्य विरामचिन्हे घालून विद्यार्थ्यांना लिहिण्यास सांगावा. हा उतारा विरामचिन्हांसह फलकावर लिहावा. तो पाहून विद्यार्थ्यांना त्यांचे लेखन तपासण्यास सांगावे.

# १८. जननायक बिरसा मुंडा



बिरसा मुंडा यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी सुगाना व करमी या आदिवासी दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे जन्मगाव उलिहातू हे रांचीजवळ आहे.

बिरसाचे आई-वडील शेतमजूर होते. घरची परिस्थिती अतिशय हलाखीची होती. गावात शाळा नसल्याने त्यांना मामाकडे शिक्षणासाठी पाठवले. तेथे मिशनरी शाळेमध्ये त्यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. शिक्षणाबरोबरच बिरसा यांना संगीत व नृत्यातही विशेष रस होता.

तो काळ पारतंत्र्याचा होता. संपूर्ण देशाला इंग्रजांनी गुलाम बनवून ठेवले होते. जंगलात राहणारे आदिवासीही या गुलामगिरीतून वाचले नव्हते. इंग्रजांनी वन-कायदा करून आदिवासींचा जंगलावरचा पारंपरिक अधिकार नाकारला होता. त्यामुळे आदिवासींमध्ये इंग्रजांच्या विरुद्‌ध असंतोष निर्माण झाला होता.

१८९४ साली बिहारमध्ये भीषण दुष्काळ पडला. उपासमार व रोगराईत अनेक लोक मरण पावले. तशातच ब्रिटिशांनी जमीनदार व जहागीरदारांकरवी शेतकऱ्यांवर अवाजवी शेतसारा लावला होता. याविरुद्‌ध बिरसाने वेळोवेळी जनआंदोलन केले. यामुळे संतप्त होऊन इंग्रज सरकारने १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. त्यांना हजारीबाग तुरुंगात डांबण्यात आले. याच तुरुंगात बिरसांनी इंग्रजी सत्ता मुळासकट उखडून टाकण्याचा संकल्प केला आणि आदिवासींच्या आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी इंग्रजांविरुद्‌ध उलगुलान पुकारला. 'उलगुलान' म्हणजे एकाचवेळी सर्वांगीण उठाव.

१८९७ नंतर बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासींनी आपल्या पारंपरिक शस्त्रांद्‌वारे अनेक लढाया केल्या. ब्रिटिशांना जेरीस आणले; परंतु ब्रिटिशांच्या आधुनिक शस्त्रांपुढे व मोठ्या सैन्यबळापुढे आदिवासी क्रांतिकारकांचा टिकाव लागू शकला नाही.

१८९८ मध्ये एका नदीकाठी झालेल्या लढाईत सुमारे ४०० आदिवासी क्रांतिकारक शहीद झाले.

आपल्या २५ वर्षांच्या आयुष्यात बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या शोषणाचे मूळ परकीय राजकीय व्यवस्थेत आहे हे ओळखले. त्याविरुद्‌ध आदिवासी समाजाला संघटित केले. ब्रिटिश सत्तेविरुद्‌ध वेळोवेळी लढे पुकारले. त्याचबरोबर आदिवासींचे आर्थिक शोषण करणाऱ्या जमीनदार व जहागीरदार यांच्या विरोधातही बंड पुकारले. त्यामुळेच आजही आदिवासी समाज बिरसा मुंडा यांना आपला नेता मानतो. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे.

सन १९०० मध्ये बिरसा मुंडा पहाडांमध्ये आदिवासी जनतेस मार्गदर्शन करत असताना ब्रिटिश सैन्याने अचानक हल्ला चढवला. त्या ठिकाणी भीषण लढाई झाली. बिरसा मुंडांना चक्रधरपूर येथे बंदी बनवून रांची येथील कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. तुरुंगात त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले. त्यामुळे ९ जून १९०० रोजी त्यांना तुरुंगातच वीरगती प्राप्त झाली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात बिरसा मुंडा हे नाव अमर झाले.

या वीराने आदिवासींच्या न्याय्य हक्कांसाठी मोठा लढा दिला. त्यामुळे लोकांनी त्यांना 'जननायक' हा किताब बहाल केला.

**शब्दार्थ :** **शेतसारा** – शेतजमिनीवरील कर. **जनआंदोलन** – लोकांनी केलेले आंदोलन. **सक्तमजुरी** – अतिशय कष्टाचे काम. **किताब** – पदवी.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) बिरसा मुंडा यांचा जन्म केव्हा व कोठे झाला ?
(आ) बिरसा मुंडा यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कोणत्या शाळेत झाले ?
(इ) बिरसा मुंडा यांना कोणकोणत्या गोष्टींत विशेष रस होता ?
(ई) तुरुंगात असताना बिरसा मुंडा यांनी कोणता संकल्प केला ?
(उ) बिरसा मुंडा यांना लोकांनी कोणता किताब बहाल केला ?

**प्र. २. गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.**

(अ) संपूर्ण देशाला ............... गुलाम बनवून ठेवले होते.
(आ) १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना ............ वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली.
(इ) बिरसा मुंडा यांना .................. तुरुंगात डांबण्यात आले.

**प्र. ३. वाक्प्रचार व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) रस असणे. | (अ) तुरुंगवासाला पाठवणे. |
| (२) असंतोष निर्माण होणे. | (आ) एखादी गोष्ट करण्याचा निश्चय करणे. |
| (३) कारावास ठोठावणे. | (इ) टिकणे. |
| (४) संकल्प करणे. | (ई) देशासाठी लढताना मरण येणे. |
| (५) टिकाव लागणे. | (उ) रुची असणे, आवड असणे. |
| (६) वीरगती प्राप्त होणे. | (ऊ) चीड निर्माण होणे. |

**प्र. ४. 'जननायक' हा किताब जसा बिरसा मुंडा यांना मिळाला, तसे खालील किताब कोणाला मिळाले ?**

(अ) महात्मा (आ) लोकमान्य (इ) स्वातंत्र्यवीर (ई) नेताजी (उ) क्रांतिसिंह (ऊ) लोकनायक

**प्र. ५. पाठात आलेल्या सनांची व घटनांची यादी करा.**

उदा., १५ नोव्हेंबर १८७५ – बिरसा मुंडा यांचा जन्म.

# १९. हें कोण गे आई ?

- **ऐका. म्हणा. वाचा.**

नदीच्या शेजारीं । गडाच्या खिंडारीं
झाडांच्या ओळींत । वेळूंच्या जाळींत
दिवसा दुपारीं । जांभळी अंधारी
मोडकें देऊळ । त्यावरी पिंपळ
कोण गे त्या ठायीं । राहतें गे आई ? ।।१।।





चिंचांच्या शेंड्यांना । वडांच्या दाढ्यांना
ओढोनी हालवी । कोण गे पालवी ?
कोण गे जोरानें । मोठ्यानें मोठ्यानें
शीळ गे वाजवी ? पांखरां लाजवी ?
सारखी किति वेळ । ऐकूं ये ती शीळ ? ।।२।।

वाळलीं सोनेरी । पानें गे चौफेरीं
मंडळ धरोनी । नाचती ऐकोनी !
किती मीं पाहीलें । इतकेंची देखीलें —
झाडांच्या साउल्या । नदींत कांपल्या !
हांका मीं मारिल्या । वांकोल्या ऐकिल्या ।।३।।

उरांत धडधडे । धांवतां मी पडें
पळालों तेथून । कोण ये मागून ? ।।४।।

**– भा. रा. तांबे**

**शब्दार्थ : गडाचे खिंडार –** किल्ल्याचा अरुंद रस्ता **ठायी –** ठिकाणी. **वडाची दाढी –** वडाची पारंबी. **ओढोनी –** ओढून. **पांखरां –** पाखरांना, पक्ष्यांना. **चौफेरी –** सगळीकडे. **मंडळ –** गोलाकार. **इतकें –** एवढे. **देखीलें –** पाहिले. **साउल्या–** सावल्या. **कापणे –** हालणे, कंप पावणे, थरथरणे. **वांकोल्या ऐकिल्या –** प्रतिध्वनी ऐकला. **उरांत –** हृदयात.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पाखरांसारखी शीळ कोण वाजवत आहे ?

(आ) कवी घाबरून का पळाला ?

(इ) कवितेत घडलेल्या सर्व घटना कोणामुळे घडल्या ?

(ई) कवीने वाकुल्या केव्हा ऐकल्या ?

**प्र. २. खालील गोष्टींसाठी कवीने कोणते शब्द वापरले आहेत ?**

(अ) वडाच्या पारंब्या.

(आ) दाट झाडांतून–पानांतून वारा वेगाने वाहतो तेव्हा येणारा आवाज.

(इ) वावटळ.


**प्र. ३. तुम्ही कधी एखाद्या गोष्टीला घाबरला होतात का ? त्या वेळी तुम्हांला काय अनुभव आला ?**

### बदलती भाषा

ही कविता फार पूर्वीची आहे. त्या काळी अनेक शब्द वेगळ्या पद्धतीने लिहिले, बोलले जात असत. आता आपण ते निराळ्या पद्धतीने लिहितो. खालील तक्ता पाहा. शब्द उच्चारण्याच्या नव्हे, तर लिहिण्याच्या पद्धतीदेखील वेळोवेळी बदलतात.

| | | | |
|---|---|---|---|
| ओळींत – ओळीत | जाळींत – जाळीत | दुपारीं – दुपारी | मोडकें – मोडके |
| ठायीं – ठायी | राहतें – राहते | जोरानें–जोराने | मोठ्यानें – मोठ्याने |
| पांखरां – पाखरा | ऐकूं – ऐकू | वाळलीं – वाळली | पानें – पाने |
| चौफेरीं – चौफेरी | मीं – मी | पाहीलें – पाहिले | इतकेंची – इतकेची |
| देखीलें – देखीले | नदींत – नदीत | कांपल्या – कापल्या | हांका – हाका |
| उरांत – उरात | धांवतां – धावता | पडें – पडे | पळालों – पळालो |
| किति – किती | शेजारीं – शेजारी | खिंडारीं – खिंडारी | वांकोल्या – वाकुल्या |

# आम्ही सूचना फलक वाचतो




**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. किल्ल्याचे वर्णन करायला सांगावे. किल्ल्याजवळच्या सूचना फलकावरील मजकूर वाचून घ्यावा. त्यावर चर्चा करावी. आपल्या शाळेसाठी असा सूचना फलक तयार करण्यास विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे.

# २०. कोलाज



## सचिन रमेश तेंडुलकर




**जन्मदिनांक :** २४ एप्रिल १९७३

**पहिला कसोटी सामना :** १५ नोव्हेंबर १९८९

**पहिला एक दिवसीय सामना :** १८ डिसेंबर १९८९

एक दिवसीय शतके : ४९

एक दिवसीय सामन्यांतील अर्धशतके : ९६




कसोटी शतके : ५१

एक दिवसीय सामन्यांतील धावा : १८,४२६

कसोटीमधील धावा : १५,९२१

**शेवटचा कसोटी सामना :** १४ नोव्हेंबर २०१३

**शेवटचा एक दिवसीय सामना :** १८ मार्च २०१२





सचिन तेंडुलकरला भारतरत्न हा सर्वोच्च नागरी सन्मान देण्यात आला. सर्वांत कमी वयात 'भारतरत्न' पुरस्काराने सन्मानित.

### जागतिक विक्रम

- पुरुषांच्या एक दिवसीय स्पर्धेत द्विशतक करणारा पहिला खेळाडू.
- कसोटी आणि एक दिवसीय क्रिकेट सामने सर्वोच्च संख्येने खेळणारा खेळाडू.
- आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये शतकांचे शतक करणारा एकमेव खेळाडू.
- कसोटी क्रिकेटमध्ये ५० पेक्षा जास्त शतके करणारा एकमेव खेळाडू.
- कसोटी क्रिकेटमध्ये १५ हजार धावा करणारा पहिला फलंदाज.
- जागतिक विक्रमांमध्येही जागतिक विक्रम करणारा खेळाडू.


### काही सन्मान

- अर्जुन पुरस्कार
- राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार
- पद्मश्री
- महाराष्ट्र भूषण
- पद्मविभूषण
- भारतरत्न

सचिनचे खूप कौतुक वाटणाऱ्या एका छोट्या मुलीने त्याच्या क्रिकेटमधील विक्रमांची व इतर माहिती जमवून हा 'कोलाज' बनवला आहे. तुम्हीदेखील तुमच्या आवडत्या व्यक्तीचा किंवा खेळाडूचा असा कोलाज तयार करा.


# माझा आवडता क्रिकेटपटू





**निरोप समारंभातील भाषण**

क्रिकेटमधून निवृत्त होतानाच्या भाषणात सचिनने त्याला मदत करणाऱ्या सर्वांचे म्हणजे – त्याचे आई-बाबा, कुटुंबीय, नातेवाईक, मित्र, गुरू, डॉक्टर, प्रशिक्षक, व्यवस्थापक, प्रसारमाध्यमे – या सगळ्यांचे आभार मानले.



आमचा लाडका सचिन!



१९९९ च्या विश्वचषक स्पर्धेतील सामने सुरू असताना सचिनचे वडील प्रा. रमेश तेंडुलकर यांचे निधन झाले. सचिन थोड्याच काळासाठी इंग्लंडहून भारतात आला आणि लगेचच स्पर्धेसाठी परत गेला. केनियाविरुद्धच्या पुढील सामन्यात त्याने नाबाद शतक केले. (१०१ चेंडूंत १४० धावा.) हे शतक त्याने आपल्या वडिलांना अर्पण केले.

रमाकांत आचरेकर सरांविषयी सचिन काय म्हणाला –

''गेल्या २९ वर्षांमध्ये सर मला कधीही 'छान खेळलास' असे म्हणालेले नाहीत, कारण मी बेसावध होईन आणि मेहनत करायचे थांबवेन, असे त्यांना वाटायचे. आता माझ्या कारकिर्दीबद्दल ते कदाचित म्हणतील, 'उत्तम', कारण यापुढील आयुष्यात मी सामने खेळणार नाही. मी क्रिकेट पाहत राहीन आणि क्रिकेट कायम माझ्या हृदयात असेल. सर, माझ्या आयुष्यातील तुमचे योगदान फार मोठे आहे आणि त्यासाठी धन्यवाद !''





वर्तमानपत्रे, मासिके यांतील कात्रणे, चित्रे, फोटो, घोषणा, माहिती, उतारे, कविता या सगळ्यांची कलात्मक मांडणी करून कोलाज बनवला जातो. एका कोलाजमध्ये एक विषय मांडला जातो किंवा अनेक विषय एकत्रितपणे मांडले जातात.

## 'भारतरत्न'


'भारतरत्न' सन्मान पदकाच्या दोन्ही बाजू

'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे. हा सन्मान राष्ट्रीय सेवेसाठी दिला जातो. या राष्ट्रीय सेवांमध्ये कला, साहित्य, विज्ञान, सार्वजनिक सेवा आणि क्रीडा यांचा समावेश आहे. या सन्मानाचा प्रारंभ २ जानेवारी १९५४ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या काळात केला गेला.

सुरुवातीला हा सर्वोच्च नागरी सन्मान मरणोत्तर देण्याची प्रथा नव्हती. इ. स. १९५५ मध्ये हा नागरी सन्मान मरणोत्तरसुद्धा देण्याची तरतूद करण्यात आली. हा नागरी सन्मान एका वर्षात जास्तीत जास्त तीन व्यक्तींना देण्यात येतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांना इ. स. १९५४ साली पहिला भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देऊन गौरवण्यात आले.

### *'भारतरत्न' सन्मानप्राप्त काही सन्माननीय व्यक्ती*

| क्र. | नाव | सन |
|---|---|---|
| १. | डॉ. धोंडो केशव (महर्षी अण्णासाहेब) कर्वे | १९५८ |
| २. | डॉ. पांडुरंग वामन काणे | १९६३ |
| ३. | आचार्य विनोबा (विनायक नरहर) भावे | १९८३ (मरणोत्तर) |
| ४. | डॉ. बाबासाहेब (भीमराव रामजी) आंबेडकर | १९९० (मरणोत्तर) |
| ५. | लता दीनानाथ मंगेशकर | २००१ |
| ६. | पंडित भीमसेन जोशी | २००८ |
| ७. | सचिन रमेश तेंडुलकर | २०१३ |



# २१. आभाळमाया

• ऐका. म्हणा. वाचा.



पावसा रे, पावसा रे,
मला पावसाचे ढग बनू दे.
डोंगर, दरी आणि शेतात,
मला खूप कोसळू दे.



शेतकरीबाबा, शेतकरीबाबा
मला बी म्हणून पेरून दे,
शेत खूप पिकून पिकून,
तुम्हांला बरकत होऊ दे.



पणती गं, पणती गं,
मला दिवा होऊन जळू दे.
गरिबांच्या झोपडीत,
उजेड मला नेऊ दे.



पक्ष्या रे, पक्ष्या रे,
मला चोच आणि पंख फुटू दे.
तोंडात फळे घेऊन जाऊन,
भुकेकंगालांना वाटू दे.



परी गं, परी गं,
मला बागेत येऊ दे.
आनंदाने नाचगाण्यासाठी,
साऱ्यांना आभाळमाया मिळू दे.

– विलास सिंदगीकर



**शब्दार्थ : कोसळणे** – जोरात पडणे. **भुकेकंगाल** – भुकेलेले आणि पैसा नसलेले.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) पावसाचे ढग होऊन कोठे कोसळावे असे कवीला वाटते ?

(आ) शेतकऱ्याला बरकत केव्हा येते ?

(इ) कवीला उजेड कोठे न्यायचा आहे ?

(ई) पक्ष्याकडे पाहून कवीला काय वाटते ?

(उ) आभाळमाया मिळावी, असे कवी का म्हणतो ?

**प्र. २. कवीला खालील गोष्टी पाहून काय व्हावेसे वाटते ?**

(अ) पाऊस (आ) पणती

**प्र. ३. खालील गोष्टींचा वापर कशासाठी होतो ते सांगा.**

(अ) अंगण (ई) फुले

(आ) मैदान (उ) दिवा

(इ) शेत

**प्र. ४. तुम्ही कोणासाठी काय द्याल ?**

(अ) मित्रांसाठी (आ) शाळेसाठी (इ) घरासाठी


(ई) शेतासाठी (उ) आईसाठी (ऊ) बाबांसाठी

**प्र. ५. तुम्ही पक्षी झाला आहात, अशी कल्पना करून पाच–सहा ओळी लिहा.**





## आम्ही चित्रवर्णन करतो




- **या चित्राचे आठ ते दहा ओळींत वर्णन लिहा.**

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. विद्यार्थ्यांना चित्रातील न कळलेल्या बाबींची माहिती सांगावी. चित्राचे तोंडी किंवा लेखी वर्णन करण्यास सांगावे. रेल्वे/बस प्रवासाचा स्वत:चा एखादा अनुभव कथन करण्यास सांगावे.

# २२. होय, मीसुद्धा !

'मोऽऽऽहन', अशी आईची हाक ऐकताच मोहन समजला, 'आईचं काहीतरी काम आहे.' आई कुठल्या वेळी कशी हाक मारते, हे मोहनला पक्के ठाऊक होते.

कपाळावर आठ्या घालतच मोहन घरात आला. त्याला खेळायला जायचे होते. मोहनला पाहताच आई म्हणाली, ''अरे राजा, एक छोटंसं काम करशील का रे ?'' मोहनने चेहरा कसनुसा केला.

''अरे, जरा मला दुकानातून डाळ, तांदूळ आणि साखर आणून दे ना रे पटकन.''

मोहनने आईकडून पैसे व पिशवी घेतली आणि दुकानाकडे निघाला. दुकानदाराकडून साखर, डाळ आणि तांदूळ घेतले. दुकानदाराला पैसे दिले. दुकानदाराने परत दिलेले पैसे त्याने खिशात कोंबले. धावतच घर गाठले.

मोहनने घरात पिशवी ठेवली. आईला पैशांचा हिशेब देण्यासाठी मोहनने आकडेमोड केली. कागदावर हिशेब मांडला. खिशातले पैसे काढून भराभरा मोजू लागला.

दुकानदाराने चुकून पन्नास रुपये मोहनला जास्त दिले होते.

त्याने हळूच पाहिले. आईचे लक्ष नव्हते. आई कामात होती. मोहनने थरथरत्या हाताने 'ती पन्नासची नोट' पँटच्या खिशात ठेवली.

त्याने आईला हिशेब दिला. उरलेले पैसे मोजून दिले. आई काही म्हणणार, तोच आईची नजर चुकवत मोहन म्हणाला, ''आई मी खेळायला जातो.''

मोहनचे मित्र खेळ खेळण्यासाठी वाटच पाहत होते. सर्वजण खेळात रमले, पण त्याचे मन खेळात रमेना. मोहन घरी परतला. आई मोहनची वाटच पाहत होती.

''चल, हातपाय धुऊन ये. जेवायला बसूया.'' मोहनने वरणभात कालवला. एक घास घेतला. एवढ्यात आई म्हणाली, ''अरे, तू सकाळी आणलेल्या तांदळाचा हा भात आहे ! काय कसा आहे तांदूळ ?''

मोहन अस्वस्थ झाला. त्याच्या पोटात खड्डा पडला. त्याला घास गिळता येईना. घास तोंडात फिरू लागला. त्याने बळेबळे घास गिळला, वर घटाघटा पाणी प्यायला.

''अरे, मघाशी दुकानातला माणूस येऊन गेला घरी.'' आई म्हणाली. त्याला आईचे पुढचे बोलणे ऐकूच आले नाही. भीतीने त्याचे पाय लटलटू लागले. पोटात बाकबूक होऊ लागले. त्याला 'ती खिशातील नोट' टोचू लागली.

आई पुढे म्हणाली, ''तो माणूस म्हणाला, की 'सकाळी दुकानात खूप गर्दी होती. त्या गर्दीत थोडा घोटाळा झाला. थोडी गडबड झाली. मग त्याच्या लक्षात आलं, त्यानं तुला चुकून...''



मोहनला पुढे ऐकणे असह्य झाले. त्याला वाटले, आपण कबूल करावे. आईला सांगावे, आपण पन्नास रुपये घेतले. त्याने डावा हात खिशात घट्ट धरला आणि झटक्यात उजवा हात वर केला, पण मोहन काही बोलू शकला नाही.

आईने त्याला वरण वाढले आणि म्हणाली, ''अरे, त्या सकाळच्या गडबडीत त्यानं तुला तांदूळ दिलेच नाहीत. थोड्या वेळानं मी पुड्या उघडल्या तर दोन पुड्यांत डाळी आणि एका पुडीत साखर ! मी तुलाच हाक मारणार होते. इतक्यात तो आला, म्हणाला, 'अवो वैनी, त्या शांताबाईंची डाळ तुमच्याकडे, आनी तुमचे तांदूळ त्यांच्याकडे. समदा घोटाळा झाला !' अरे, म्हणून तुला मी मघाशी गमतीत म्हटलं, तू आणलेला तांदूळ कसा...''

मोहनचा जीव भांड्यात पडला. तो कसनुसा चेहरा करून हसला. बळेबळे जेवला. मोहनच्या मनात चलबिचल सुरू होती. 'ती नोट' त्याला स्वस्थ बसू देत नव्हती. आईची नजर चुकवण्यासाठी त्याने गोष्टीचे पुस्तक वाचायला घेतले, पण त्याचे लक्ष लागेना. त्याने पुस्तक ठेवून दिले.


आई मोहनजवळ येत म्हणाली, ''आज शनिवार, आता इतक्यात बाबा येतीलच. मग आज संध्याकाळी आपण बाहेर जाऊ. तुला आणि बाबांना शर्टाचं नवीन कापड घेऊ, पण हे बाबांना सांगायचं नाही. आपण दोघं मिळून त्यांना चकित करू.''

मोहनला आवंढा गिळताना त्रास होऊ लागला. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत आई म्हणाली, ''अरे, माझ्या लहानपणी आमची गरिबी होती. माझा फाटलेला फ्रॉक पाहून माझ्या मैत्रिणीच्या आईनं मला मैत्रिणीचा फ्रॉक देऊ केला होता; पण मी त्यांना ठणकावून सांगितलं – काकू, आम्ही गरीब जरूर आहोत, पण स्वाभिमानी आहोत. ज्यांची खरंच ऐपत नसेल त्यांना द्या. हे मी घरी सांगितल्यावर आईनं मला शाबासकी दिली. कोणाचं फुकट काही घेतलेलं तिला आवडत नव्हतं, बाबांनी दिवाळीला ठिगळं लावलेला शर्ट घातला, पण मला नवीन फ्रॉक आणला.''

मोहन ढसाढसा रडू लागला. मोहनचे डोळे पुसत आई म्हणाली, ''अरे राजा, नवीन शर्टाचा विषय निघाला, म्हणून ही जुनी गोष्ट आठवली. रडायला रे काय झालं तुला ? हे बघ, तू माझा मुलगा आहेस. माझ्यासारखाच स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहेस.''

मोहनचा हात नकळत खिशावर गेला. मोहन ताडकन उठला व म्हणाला, ''आई, मी आलो गं एका मिनिटात'' आणि चपला न घालताच घराबाहेर पडला.

''अरे, आता कुठे चाललास उन्हाचा ? ती टोपी तरी घाल रे आणि आता येतीलच बाबा...''



आईचे बोलणे ऐकायला मोहन घरात नव्हताच. तो भरदुपारी रस्त्यावरून अनवाणी धावत होता. तो दुकानात गेला. दुकानदार एकटाच हिशेब करत बसला होता. मोहनने दुकानदाराला ती पन्नास रुपयांची नोट परत केली. म्हणाला, ''सॉरी ! माझी चूक झाली. सकाळी मला तुमच्याकडून जास्ती पैसे आले. मला यायला उशीर झाला.'' दुकानदार हसला. त्याने मोहनला शाबासकी दिली. समोरच्या बरणीतले एक चॉकलेट काढून त्याने मोहनसमोर धरले.

मोहनने हात जोडून पुन्हा एकदा 'सॉरी' म्हटले आणि चॉकलेट न घेताच त्याने घराकडे धूम ठोकली. धापा टाकतच मोहन घरात शिरला. त्याला नीट बोलताही येईना. त्याला खूप भरून आले होते. त्याने आईचा हात हातांत घेतला आणि म्हणाला, ''होय, मीसुद्धा स्वाभिमानी आणि प्रामाणिक आहे तुझ्यासारखा ! होय, मीसुद्धा !''

**– राजीव तांबे**

**शब्दार्थ : पोटात खड्डा पडणे –** खूप भीती वाटणे. **पाय लटलट कापणे –** भीतीने पाय थरथर कापणे. **अनवाणी –** पायांत चपला वगैरे न घालता.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) आईने मोहनला दुकानातून काय आणायला सांगितले ?

(आ) मोहनने आकडेमोड का केली ?

(इ) मोहनला किती रुपये जास्त आले होते ?

**प्र. २. का, ते लिहा.**

(अ) आईने मोहनला हाक मारली.

(आ) मोहन कपाळावर आठ्या घालत घरात आला.

(इ) मोहनच्या आईला तिच्या आईने शाबासकी दिली.

(ई) दुकानदाराने मोहनला शाबासकी दिली.

(उ) मोहनला खूप भरून आले.

**प्र. ३. खालील वाक्प्रचार व त्यांच्या अर्थांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) पोटात बाकबूक होणे. | (अ) खूप रडणे. |
| (२) जीव भांड्यात पडणे. | (आ) खूप घाबरणे. |
| (३) ढसाढसा रडणे. | (इ) दिलासा मिळणे. |

**प्र. ४. खालील शब्दांना जोडून येणारे शब्द लिहा.**

(अ) आकडे.................. (इ) हात.....................

(आ) आरडा.................. (ई) कावरा..................

**प्र. ५. पाठात 'पायांत जोडे न घातलेला' – या शब्दसमूहाबद्दल 'अनवाणी' हा एक शब्द आलेला आहे. खालील शब्द वाचा. असे आणखी शब्द शोधून लिहा.**

(अ) जन्म झालेले ठिकाण – जन्मस्थान

(आ) विमान चालवणारा – वैमानिक

(इ) कविता करणारी – कवयित्री

(ई) शोध लावणारा – संशोधक

(उ) देशाची सेवा करणारा – देशसेवक

**प्र. ६. वाक्यातील रिकाम्या जागी खालील शब्दसमूहांची योग्य रूपे वापरा.**

(चेहरा कसनुसा करणे, नजर चुकवणे, अस्वस्थ होणे.)

कपबश्या कपाटात ठेवताना माझ्या हातून एक कप फुटला. त्यामुळे मी .......... झालो. मी .......... आईकडे गेलो. तिच्याशी .......... बोलू लागलो.

**प्र. ७. 'दुकान' या शब्दाला 'दार' प्रत्यय लावून 'दुकानदार' असा शब्द पाठात आलेला आहे. असे आणखी शब्द शोधून लिहा.**



# २३. मन्हा खान्देस्नी माटी

- ऐका. म्हणा. वाचा.



मन्हा खान्देस्नी माटी
सोनानी थाटी,
जागे जागे देखा
अहिरानीनी दाटी.

मन्हा खान्देस्नी माटी
सोनानी मूस
शिवारे शिवारे
हिरवागार ऊस.

मन्हा खान्देस्नी माटी
कच्ची चांदीना तुकडा,
केयी कमयजाना
देखील्या मुखडा.

मन्हा खान्देस्नी माटी
लोनी सारखी मऊ,
पिकस सालोसाल
सायमाय–गहू.

मन्हा खान्देस्नी माटी
माटी भागवान,
सदा तिन्हा जीव्वर
नही कसानी वान.

**– शकुंतला भा. पाटील**

शिक्षकांसाठी : शेतकरी शेतावर काम करताना म्हणतात, अशा गाण्यांचा संग्रह विद्यार्थ्यांना करायला सांगावा.

**शब्दार्थ :** **मन्हा** – माझ्या. **सोनानी थाटी** – सोन्याचे ताट. **देखा** – पाहा. **माटी** – माती. **मूस** – भट्टी, साचा. **केयी** – केळी. **कमयजाना** – कमळासारखे. **मुखडा** – चेहरा, तोंड. **लोनी** – लोणी. **पिकस** – पिकते. **सालोसाल** – वर्षानुवर्षे. **भागवान** – भाग्यवान. **जीव्वर** – जिवावर. **कसानी** – कशाचीही. **वान** – उणीव.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) खानदेशी मातीचा थाट कोणासारखा आहे ?

(आ) खानदेशी शिवाराला 'सोनानी मूस' का म्हटले आहे ?

(इ) खानदेशी माती कशासारखी मऊ आहे ?

(ई) खानदेशी मातीला भाग्यवान का म्हटले आहे ?

**प्र. २. कवितेतील शेवटी सारखी अक्षरे येणारे शब्द लिहा.**

**उदा.,** माटी–थाटी.

(अ) ऊस (आ) तुकडा (इ) भागवान

**प्र. ३. 'सालोसाल' यासारखे आणखी शब्द सांगा.**

**प्र. ४. 'भाग्य' या शब्दाला 'वान' हा प्रत्यय लागून 'भाग्यवान' हा शब्द तयार झाला आहे. खालील शब्दांना 'वान' प्रत्यय लावा.**

(अ) बल (आ) धन (इ) गाडी (ई) गुण

**उपक्रम :** परिसरातील शेतांमध्ये जाऊन तेथील पिकांचे व मातीचे निरीक्षण करा. शेतकऱ्यांकडून त्याबद्दलची माहिती घेऊन वहीत लिहा.



## वाचा.

मोहन मित्राकडे खेळायला आलेला असतो. तेथे त्याला काका भेटतात.


काका : अरे, मोहन तुझे बाबा कुठे आहेत?

मोहन : काका, ते घरी आहेत.

काका : तू हे कशावरून सांगतोस?

मोहन : अहो काका, मी त्यांच्या चपला घालून आलोय.

## आमचे गाव (नकाशा)




**स्वाध्याय**

**प्र. १. एका गावातील छोट्या भागाचे चित्र वर दिले आहे. ते काळजीपूर्वक अभ्यासा. रमेशच्या घराकडे पाठ केल्यानंतर सरळ पूर्वेकडे गेले, की तळे येते हे लक्षात ठेवून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. चित्रामध्ये पेन्सिलने रेघा काढून सर्व उत्तरे दाखवा.**

(अ) ग्रामपंचायत कोणाच्या घराजवळ आहे ?

(आ) रमेश सुट्टीच्या दिवशी गोपाळकडे खेळायला गेला. त्याला रस्त्यात काय काय लागले ?

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांना चित्राचे निरीक्षण करायला सांगावे. चित्रात काय काय दिसते ते विचारावे. विद्यार्थ्यांना चित्रातील न कळलेल्या बाबींची माहिती सांगावी.

(इ) जोसेफच्या घरापासून बसस्थानकापर्यंत येताना वाटेत काय काय लागेल ?

(ई) जोसेफला कोणत्या दिशेने गेल्यास जस्मिनचे घर जवळ पडेल ? वाटेत काय लागेल ?

(उ) जोसेफच्या घरापासून ग्रामपंचायतीला जाण्यासाठी कोणकोणत्या मार्गांनी जाता येईल ? दिशांसहित उत्तरे लिहा.

(ऊ) बसस्थानकावरून वाचनालयाकडे जाताना वाटेत काय काय लागेल ?

(ए) मंदारला त्याच्या घरापासून शाळेला जाण्याचा सर्वांत जवळचा मार्ग कोणता ?

**प्र. २. तुमच्या घरापासून शाळेत येण्याच्या मार्गाचे रेखाचित्र तयार करा.**

## आम्ही असेही बोलतो

ही इंडी गावातली शाळा. सय्यदबाई अन् कलबुर्गीसर तिसरी आणि चौथीला शिकवतात. या शाळेतली मुलं, शिक्षक कन्नड बोलतात. ती त्यांच्या सरांना, बाईंना काय सांगतायत ते पाहा.



ही चन्नाक्का. ती बाईंना काय विचारते ?



ही जमीला. तिने तिचे बोट कशासाठी वर केले आहे ?



हे कलबुर्गीसर. ते मुलांना काय सांगतायत ?

वरील चित्रांतील मुलं कन्नड भाषा बोलणारी आहेत. त्यांची भाषा आपल्याला येत नाही. तरीही त्यांनी केलेल्या खाणाखुणांवरून त्यांना काय म्हणायचं ते आपल्याला कळतं. ती मुलं व शिक्षक खुणांनी काय सांगत असतील ते सांगा.

तोंडातून एकही शब्द न काढता कसं बोलता येतं, कळलं ना ? असा खेळ वर्गात खेळून पाहा. खेळाचा एक नियम आहे - एक अक्षरही बोलायचं नाही, लिहायचं नाही, फक्त खाणाखुणा करायच्या. खालील वाक्ये वाचा. ही मुलं खाणाखुणा कशा प्रकारे करतील ते वर्गात दाखवा.

१. अनिलला भूक लागली आहे.

२. निशाला झोप येत आहे.

३. तुमच्या वर्गाचा संघ खो-खोमध्ये जिंकला आहे, म्हणून तुम्हांला आनंद झाला आहे.

४. मधल्या सुट्टीत बारकू वर्गातल्या मित्रमैत्रिणींना जेवायला बोलवत आहे.

६. झरीना मागच्या बाकावरच्या महेशला पुढे बोलवत आहे.

७. शिल्पाची छोटी बहीण सारखी रडते, हे ती तिच्या मैत्रिणींना सांगते आहे.

**शिक्षकांसाठी :** वरील चित्रे विद्यार्थ्यांना दाखवावी. विद्यार्थ्यांना खुणांचा अर्थ समजावून सांगावा.

# २४. थोर हुतात्मे

लाहोरचा प्रचंड तुरुंग. सर्वत्र गंभीर, भयसूचक वातावरण. सशस्त्र सैनिकांचा कडेकोट बंदोबस्त. थोड्याच वेळानंतर फासावर चढवले जाणार असलेले तीन तरुण क्रांतिवीर 'इन्किलाब झिंदाबाद'च्या घोषणा देत निघाले होते. सकाळपासून बाहेर मोठा जमाव जमला होता.

साक्षात मृत्यू समोर उभा असताना क्रांतीचा जयजयकार करणारे कोण होते ते निर्भय तरुण ? ते होते भारतमातेचे थोर सुपुत्र भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव.

सन १९२८ साली लाहोर येथे 'सायमन कमिशन'च्या विरोधात जी उग्र निदर्शने झाली, त्यांत ब्रिटिश अधिकारी स्कॉटच्या आदेशावरून पोलिसांनी तुफान लाठीमार केला. त्यात थोर पंजाबी नेते लाला लजपतराय हे जबर जखमी झाले व त्यातच १७ नोव्हेंबर १९२८ रोजी मरण पावले. सारा देश हळहळला. या हत्येचा बदला घेण्याचा निर्धार करून ब्रिटिश अधिकारी स्कॉटला ठार मारण्याची कामगिरी चंद्रशेखर आझाद, राजगुरू, भगतसिंग व जयगोपाल यांच्यावर सोपवण्यात आली.

१७ डिसेंबर १९२८ रोजी लाहोर येथे पोलीस कचेरीतून इंग्रज अधिकारी बाहेर पडला, तसा त्याचा पाठलाग करून राजगुरूंनी गोळ्या झाडल्या. पाठोपाठ भगतसिंगांनीही गोळ्या झाडल्या. मारला गेलेला ब्रिटिश अधिकारी स्कॉट नसून त्याचा सहायक 'सॉंडर्स' होता.

हत्येच्या या घटनेनंतर चंद्रशेखर आझाद व राजगुरू दोन वर्षांपर्यंत भूमिगत होते. भगतसिंगांसह अनेक क्रांतिकारकांना अटक करण्यात येऊन त्या सर्वांवर खुनाचा खटला भरण्यात आला. तो कित्येक दिवस चालला. चंद्रशेखर आझाद मात्र शेवटपर्यंत पोलिसांच्या हाती लागले नाहीत. पुढे अलाहाबादच्या आल्फ्रेड पार्कमध्ये पोलिसांच्या चकमकीत ते ठार झाले.

दि. ३० सप्टेंबर १९२९ रोजी राजगुरूंना पुण्यात अटक झाली. खटल्याच्या अखेरीस भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. 'इन्किलाब झिंदाबाद ! इन्किलाब झिंदाबाद !' अशी घोषणा देत तिन्ही क्रांतिकारक हसत हसत फासावर चढले. दि. २३ मार्च १९३१ रोजी भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांना लाहोर तुरुंगात सायंकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी फाशी देण्यात आले. भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा अंत्यविधी फिरोजपूरजवळ (पंजाब) सतलज नदीच्या काठी त्याच रात्री करण्यात आला. फिरोजपूर (पंजाब) येथे भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांची समाधी आहे.

सरदार भगतसिंगचा जन्म पंजाबातील बंग (सध्या हे गाव पाकिस्तानात आहे) या गावी सन १९०७ साली एका क्रांतिकारी कुटुंबात झाला. वडील किशनसिंग व चुलते स्वर्णसिंग - दोघांनाही देशासाठी तुरुंगात जावे लागले असल्याने भगतसिंगांना देशभक्तीचे बाळकडू कुटुंबातून मिळाले होते. त्यांचे प्रारंभीचे शिक्षण बंग या जन्मगावी झाले. उच्च शिक्षण लाहोर येथे दयानंद अँग्लो-वेदिक



भगतसिंग

महाविद्यालय व नॅशनल कॉलेज येथे झाले. विद्यार्थिदशेत जयचंद विद्यालंकार व भाई परमानंद या शिक्षकांचा त्यांच्यावर विशेष प्रभाव होता. पदवी मिळवून ते घरी परतले.

कानपूरला जाऊन 'प्रताप' वृत्तपत्रात त्यांनी बलवंतसिंग या नावाने क्रांतिकारी लेखन व कार्यही सुरू केले. पोलिसांना त्यांच्या गुप्त हालचालींचा सुगावा लागताच कानपूर सोडून भगतसिंगांनी दिल्ली गाठली. लाहोरप्रमाणे दिल्ली हे देखील भारतीयांच्या असंतोषाचे दुसरे केंद्र झालेले होते. दिल्लीच्या 'अर्जुन' साप्ताहिकात बलवंतसिंग याच नावाने ते काम करू लागले. तिथेही पोलिसांची पाळत वाढली, तेव्हा ते लाहोरला आले व मुंडण करून भगतसिंग या नावाने वावरू लागले.



राजगुरू

शिवराम हरी राजगुरू यांचा जन्म महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील खेड येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. प्राथमिक शिक्षणानंतर ते विदर्भाची सांस्कृतिक राजधानी अमरावती येथे गेले. तेथील हनुमान आखाड्याच्या वातावरणात त्यांना देशभक्तीची दीक्षा मिळाली. पुढे संस्कृतच्या अध्ययनासाठी ते बनारसला गेले. न्यायशास्त्रातील मध्यमा परीक्षा उत्तीर्ण झाले. त्याच वेळी इंग्रजी, कन्नड, मल्याळम, हिंदी व उर्दू याही भाषा त्यांनी चांगल्या अवगत केल्या. काही काळ ते 'काँग्रेस सेवादला'त देखील होते, मात्र बनारसच्या त्या वास्तव्यात चंद्रशेखर आझाद, सचिंद्रनाथ संन्याल आदी क्रांतिनेत्यांशी त्यांची ओळख झाली व त्यांच्या 'हिंदुस्थान रिपब्लिकन आर्मी' मध्ये दाखल होऊन राजगुरूंनी 'रघुनाथ' या टोपणनावाने उत्तर भारतात उसळलेल्या क्रांतिकार्यात सक्रिय सहभाग घेतला. त्याच सुमारास त्यांची भगतसिंग, जतिनदास, सुखदेव आदी पंजाबी क्रांतिनेत्यांशी मैत्री झाली.



सुखदेव

सुखदेव यांचे संपूर्ण नाव सुखदेव रामलाल थापर. आईचे नाव शल्लीदेवी असे होते. सुखदेव यांचा जन्म १५ मे १९०७ रोजी लुधियानातील चौराबाजार येथे झाला. या ठिकाणाला 'नऊघर' असेही म्हणतात. त्यांनी पंजाबमध्ये क्रांतिकारकांची संघटना स्थापन केली. किंग जॉर्जच्या विरोधात गुप्त मसलतीच्या योजनेमुळे ब्रिटिश सरकारने त्यांना धमकावले. त्यामुळे ब्रिटिश सरकार विरुद्ध सुखदेव अशी स्थिती निर्माण झाली.

सुखदेवांनी ल्यालपूर (पंजाब) येथे १९२६ पासून तरुणांना एकत्र जमवण्यास सुरुवात केली. 'हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन' नावाची नवीन देशव्यापी संघटना उभारण्याचे ठरले. भारताला ब्रिटिशांच्या शोषणातून मुक्त करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट होते. सामाजिक न्यायावर व समतेवर आधारित समाज निर्माण करणे, हे त्यांचे ध्येय होते. केंद्रीय समितीत सुखदेव व भगतसिंग हे पंजाबतर्फे होते. यात शिववमी, चंद्रशेखर आझाद आणि कुंदनलाल हे विद्यार्थीही होते.

लाहोरच्या नॅशनल कॉलेजमधील अभ्यासिकेत सुखदेव यांनी भारताचा इतिहास, रशियन राज्यक्रांती या विषयांचा चिकित्सकपणे अभ्यास केला. जागतिक पातळीवरील क्रांतिकारक साहित्याचे विविध दृष्टिकोन त्यांनी अभ्यासले. कॉम्रेड रामचंद्र, भगतसिंग आणि भगवतीचरण व्होरा यांच्या मदतीने त्यांनी 'नौजवान भारत सभा' ही संघटना लाहोर येथे स्थापन केली. या संघटनेचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे ठरवण्यात आले – स्वातंत्र्यलढ्यासाठी तरुणांना प्रोत्साहित करणे; तर्कसंगत वैज्ञानिक दृष्टीचा अवलंब करणे; जातीयतेविरुद्ध लढणे व अस्पृश्यतेची प्रथा बंद करणे. या कार्यक्रमात त्यांनी सक्रिय भाग घेतला.

१९२९ मध्ये लाहोर खटल्याबद्दल तुरुंगात असताना त्यांनी कैद्यांना मिळणाऱ्या अमानुष वागणुकीबद्दल उपोषण केले. सुखदेव यांना लाहोर खटल्यात माफीचा साक्षीदार होण्याचे सुचवण्यात आले; पण त्यांनी ते बाणेदारपणे नाकारले. या आणि अशा अनेक प्रसंगांतून सुखदेव यांचे अतुलनीय धैर्य, प्रखर देशभक्ती आणि त्यागी वृत्ती यांचा प्रत्यय येतो. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ लुधियाना येथील शाळेस सुखदेव यांचे नाव देण्यात आले आहे.

भारत–पाकिस्तान फाळणीनंतर हुसेनीवाला हा भाग पाकिस्तानात गेला होता; पण भारत सरकारने बदली जमीन देऊन तो भाग मिळवला. सन १९६८ मध्ये भारत सरकारतर्फे तेथे भगतसिंगांचे भव्य स्मारक उभारले गेले. त्या वेळी भगतसिंग यांच्या वृद्ध माता विद्यावती उपस्थित होत्या.

हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या स्मरणार्थ 'खेड' या त्यांच्या जन्मगावाचे नामांतर 'राजगुरूनगर' असे करण्यात आले आहे. जन्मस्थळी त्यांचे स्मारकही आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळावे म्हणून प्राणांची आहुती देणाऱ्या या क्रांतिकारक हुतात्म्यांचे नाव स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात अजरामर झाले.

## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लाहोरच्या तुरुंगातले तीन क्रांतिवीर कोणत्या घोषणा देत होते ?
(आ) १९२८ साली लाहोरमध्ये कशाच्या विरोधात निदर्शने झाली ?
(इ) भगतसिंगांनी कोणकोणत्या महाविद्यालयांत उच्च शिक्षण घेतले ?
(ई) ब्रिटिश सरकारने सुखदेव यांना कशामुळे धमकावले ?
(उ) कोणाकोणाच्या मदतीने सुखदेवांनी 'नौजवान भारत सभा' स्थापन केली ?

## प्र. २. दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा.

(अ) पोलिसांच्या हाती सापडू नये म्हणून भगतसिंगांनी काय काय केले ?

(आ) 'नौजवान भारत सभा' या संघटनेचे कार्यक्रम कोणकोणते होते ?

(इ) बनारसच्या वास्तव्यात राजगुरू यांनी काय काय केले ?

## प्र. ३. जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| (१) राजगुरू | (अ) चौराबाजार |
| (२) भगतसिंग | (आ) कानपूर |
| (३) सुखदेव | (इ) खेड |
| (४) प्रताप वृत्तपत्र | (ई) बंग |

## प्र. ४. खालील उत्तरे येतील असे योग्य प्रश्न तयार करा. एकाच उत्तरासाठी एकापेक्षा जास्त प्रश्न तयार होऊ शकतात.

(अ) लाहोरप्रमाणे दिल्ली हेदेखील भारतीयांच्या असंतोषाचे दुसरे केंद्र झाले.

(आ) राजगुरू काही काळ काँग्रेस सेवादलात देखील होते.

(इ) लाहोरमधील लाठीमारात लाला लजपतराय जखमी झाले.

(ई) सुखदेव यांनी 'नौजवान भारत सभा' स्थापन केली.

## प्र. ५. खालील शब्दसमूहांचा वाक्यात उपयोग करा.

(अ) बाळकडू मिळणे.

(आ) सुगावा लागणे.

(इ) पाळत ठेवणे.

(ई) दीक्षा मिळणे.

(उ) निर्धार करणे.

(ऊ) भूमिगत होणे.

## प्र. ६. राजगुरू यांच्या स्मरणार्थ त्यांच्या जन्मगावाचे म्हणजे 'खेड' चे नाव बदलून 'राजगुरूनगर' करण्यात आले आहे. शिक्षकांशी, पालकांशी चर्चा करून तुमच्या माहितीतल्या अशा नावे बदललेल्या गावांची यादी करा.

## प्र. ७. खालील शब्दांना 'कारक' प्रत्यय लावून शब्द बनवा. त्यांचा अर्थ शोधा. असे आणखी शब्द शोधा व लिहा.

(अ) अन्याय...........

(आ) बंधन...........

(ई) सुख...........

(इ) अपाय...........

# २५. संतवाणी

• ऐका. म्हणा. वाचा.



अर्थेविण पाठांतर कासया करावें ।
व्यर्थचि मरावें घोकूनियां ।।
घोकूनियां काय वेगीं अर्थ पाहे ।
अर्थरूप राहे होऊनियां ।।
तुका म्हणे ज्याला अर्थीं आहे भेटी ।
नाहीं तरी गोष्टी बोलों नका ।।

**– संत तुकाराम**


ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।
नदी डोंगी परी जळ नोहे डोंगे ।
काय भुललासी वरलिया रंगे ।।
चोखा डोंगा परी भाव नोहे डोंगा ।
काय भुललासी वरलिया रंगा ।।

**– संत चोखामेळा**



ऐसे केले या गोपाळे । नाही सोवळे ओवळे ।।
काटे केतकीच्या झाडा । आत जन्मला केवडा ।।
फणसाअंगी काटे । आत अमृताचे साठे ।।
नारळ वरुता कठिण । परि अंतरी जीवन ।।
शेख महंमद अविंध । त्याचे हृदयी गोविंद ।।

**– संत शेख महंमद**



महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.

बालभारती इयत्ता ४ थी (मराठी माध्यम ) ₹ ३९.००